# प्रेसनोट

दि.०३/०८/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३३४७/२०१६ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | शुभांगी प्रल्हाद ससाणे, कामगार तलाठी, वर्ग–३, सजा चिंचपूर पांगूळ, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ३,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, आरोपी लोकसेविका शुभांगी प्रल्हाद ससाणे, कामगार तलाठी, वर्ग–३, सजा चिंचपूर पांगूळ, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे भाऊ यांचे नावे वारसपत्रानुसार नोंद झालेल्या वडीलोपार्जित शेत जमिनीचे ८ अ खाते वेगवेगळे करुन देण्यासाठी दि.२९/८/२०१६ रोजी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ३०००/– रुपये लाचेची मागणी केली व दि.२९/८/२०१६ रोजी तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष ३०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता आरोपी लोकसेविका शुभांगी प्रल्हाद ससाणे यांना रंगेहाथ पकडण्यात आले होते. सदर बाबत त्यांच्याविरुध्द दि.२९/०८/२०१६ रोजी पाथर्डी पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३३४७/२०१६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br><br>सदर सापळा कारवाई श्री.विष्णु आव्हाड, तत्कालीन पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.०२/१२/२०१६ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br><br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्रीमती एम.ए. बरालिया, जिल्हा न्यायालय–२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेविका शुभांगी प्रल्हाद ससाणे यांना आज दि.०३/०८/२०२३ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व १३(१)(ड) प्रमाणे ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/– रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br><br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.श्री.एम.व्ही.दिवाणे, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना मपोना.संध्या म्हस्के, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर